# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपध्दती:

१.जिल्हासाठी प्रतिसाद आराखडयासह आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे.

२.राष्ट्रीय धोरण,राज्याचे धोरण,राष्ट्रीय आराखडा,राज्याचा आराखडा आणि जिल्हाचा आराखडा यामध्ये समन्वय ठेवणे आणि संनियंत्रण व अंमलबजावणी करणे.

३.जिल्हयातील आपत्ती प्रवण क्षेत्र विनिर्दीष्ट करुन आपत्तीस प्रतिबंध अथवा आपत्तीच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठीच्या उपाययोजना जिल्हास्तरावरील शासकीय विभाग तसेच स्थानिक प्राधिकरणांव्दारे घेण्यात येत असल्याबाबत खातरजमा करणे.

४.आपत्तीस प्रतिबंध,आपत्तीच्या परिणामांची तीव्रता कमी करणे,सज्जता आणि प्रतिसाद या संदर्भातील उपाय योजनांबाबत राष्ट्रीय प्राधिकरण व राज्य प्राधिकरण यांनी आखून दिलेल्या मार्गदर्शकाप्रमाणे आवश्यक कार्यवाही जिल्हयातील संबंधित विभागामार्फत करण्यात येत असल्याबाबत खातरजमा करणे.

५.आपत्तीस प्रतिबंध व आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी आवश्यक त्या अन्य उपाययोजना करण्याबाबत जिल्हा पातळीवरील विविध प्राधिकरणे व स्थानिक संस्थांना सूचना देणे.

६.आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी जिल्हा पातळीवरील शासकीय विभाग व जिल्हयातील स्थानिक प्राधिकरणांना मार्गदर्शक तत्वे आखून देणे.

७. जिल्हा पातळीवरील शासकीय विभागांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखडयाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

८.जिल्हास्तरावरील विविध शासकीय विभागामार्फत तयार करण्यात आलेले विकास आराखडे व राबविण्यात येणा-या प्रकल्पांमध्ये आपत्ती प्रतिबंध व आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठीच्या उपाययोजनांमध्ये एकसुत्रता रहावी यासाठी अंमलात आणावयाची मार्गदर्शक तत्वे आखून देणे आणि त्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य पुरविणे.

९.वरील क्र.८ मध्ये उल्लेखिलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

१०.जिल्हावरील कोणताही आपत्ती किंवा जिल्हयास भेडसावणा-या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्रीच्या क्षमतेचा आढावा घेणे व आवश्यतेनुसार त्यांचे अद्यावतीकरण करण्यासंदर्भात जिल्हास्तरावरील संबंधित विभाग अथवा स्थानिक प्राधिकरणांना सूचना देणे.

११.सज्जतेसाठी नियोजित उपाययोजंनाचा आढावा घेणे आणि या उपाययोजना,कोणत्याही आपत्ती परिस्थितीत परिणामकारक ठरवण्यासाठी आवश्यक दर्जाच्या असतील याबाबत लक्ष पुरविण्यास जिल्हा पातळीवरील संबंधित विभाग व अन्य संबंधित प्राधिकरणांना सूचना देणे.

१२. जिल्हयातील वेगवेगळया स्तरावरील अधिकारी,कर्मचारी व बचाव कार्य करणारे स्वयंसेवक यांच्यासाठी खास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन व सनियंत्रण करणे.

१३.आपत्तीस प्रतिबंध अथवा आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी स्थानिक प्राधिकरण,शासकीय व अशासकीय संस्था यांच्या पाठींब्यांने समुह प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.

१४.आपत्तीची पुर्व सूचना मिळण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणे,तिची देखभाल करणे,तपासणी करणे, ती अद्यावत करणे व योग्य माहिती लोकांपर्यत पोहचेल असे पाहणे.

१५.जिल्हा पातळीवरील प्रतिसादर आराखडा तयार करणे,आढावा घेणे.व अद्यावत करणे.

१६. कोणत्याही भेडसावणा-या आपत्ती परिस्थितीत वा प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी प्रतिक्रीयास्वरुप निर्माण होणा-या परिस्थितीचे संनियंत्रण करणे.

१७.जिल्हा स्तरावरील शासकीय विभाग आणि स्थानिक प्राधिकरणे त्यांचे प्रतिसादर आराखडे जिल्हा प्रतिसाद आराखडयाशी सुसंगत असतील याची खातरजमा करणे.

१८.संभाव्य आपत्कालीन परिस्थिती अथवा प्रत्यक्ष आपत्तीस परिणामकारकपणे तोंड देण्यासाठी उपाययोजना घेण्याबाबत जिल्हा पातळीवरील शासनासंबधित विभाग किंवा स्थानिक प्राधिकरणासाठी मार्गदर्शक तत्वे आखून देणे.व त्यांना मार्गदर्शन करणे.

१९.जिल्हा पातळीवरील शासकीय विभाग, वैधानिक संस्था,आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य करणा-या इतर शासकीय व अशासकीय संस्था यांच्यामध्ये समन्वय ठेवणे,सनियंत्रण करणे,सहाय्य व सल्ला देणे.

२०.आपत्तीपूर्व व आपत्तीनंतरच्या व्यवस्थापनाच्या उपाययोजना खात्रीपूर्वक, तत्परतेणे व प्रभावीपणे घेण्यात याव्यात म्हणून जिल्हयातील स्थानिक प्राधिकरणांशी समन्वय साधणे व मार्गदर्शक तत्वे आखून देणे.

यासोबतच केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५चे कलम ३१व ३२ च्या तरतूदीन्वये संबंधित जिल्हयाचा जिल्हा आराखडा तयार करणे, तसेच विविध विभागामार्फत त्यांचे आराखडे तयार करणे कलम ३३ अन्वये आवश्यक अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवा अग्रिहीत करणे, आपत्ती प्रसंगी स्थानिक प्राधिकरणास असलेले अधिकार कलम ३४ च्या तरतूदीअन्वये प्राधिकरणास असतील.

परभणी जिल्हयात भुकंप,पूर, साथीचे रोग, औद्योगिक / रासायनिक अपघात,आग,  व रस्ते अपघात इत्यादी आपत्तीचे वेळी आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत अंतभूर्त आपातकालीन परिस्थतीनूसार युध्द स्तरावरील तातडीची कामे पार पाडण्यास्तव जिल्हास्तरावरील संस्थात्मक संरचना अंतर्गत नियंत्रण कक्षात खालील अधिका-यांची कक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात करावी व आपत्तीची सुचना मिळाल्यापासून तर मदत आणि पुनर्वसन होई पर्यंतच्या कामासाठी आपल्या विभागाचे क्षेत्रीय कृती आराखडे तयार करुन व प्रत या कार्यालयास ७ दिवसाचे आत सादर करावी. आपत्ती कालावधीतील सर्व कामाचे संनियंत्रण अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी करावे.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास केंद्र शासन आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३२,३३,व३४ च्या तरतुदी अन्वये प्राधिकरणास अधिकार आहेत. त्यान्वये शासन निर्णय दिनांक १ जुन, २००६ मधील प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपध्दती (१ ते २०) अन्वये प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपध्दती असुन त्यान्वये प्राधिकरणाने कार्यवाही करावयाची आहे.